# ताडीवाला रस्ता परिसरात कुपोषित मुले

## मुकुल माधव फाउंडेशनच्या आरोग्य शिबिरातील तपासणीत आढळली परिस्थिती

पुणे। दि. ९ (प्रतिनिधी)

मुकुल माधव फाउंडेशनच्यावतीने ताडीवाला रस्ता भागात राहणाऱ्या लहान मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या तपासणीत कुपोषित मुले आढळून आली. या मुलांना स्वच्छतेबाबत माहिती देण्यात आली आणि त्याची सवय लागावी म्हणून प्रत्येकास 'हायजिन कीट' देण्यात आले.

ताडीवाला रस्ता भागातील भीमटोला युवक संघ भागात हे शिबिर घेण्यात आले. लोकमंगल फाउंडेशनच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या शाळेतील मुलांची आणि परिसरातील मुलांची या शिबिरात तपासणी करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने कान, नाक, घसा, डोळे आणि इतर शारीरिक तपासणी करण्यात आली.

केईएम रुग्णालयातील बालरोग विभागाचे प्रमुख डॉ. आनंद पंडित, त्यांचे सहकारी डॉक्टर आणि एच. व्ही. देसाई डोळ्यांच्या रुग्णालयातील डॉक्टरांनी मुलांच्या तपासण्या केल्या. ज्या मुलांमध्ये शारीरिक दोष, त्रास आढळून आला त्यांना पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आले. शिबिरात १०८ हून बालकांची तपासणी करण्यात आली.

शिबिरात मुलांना स्वच्छतेबाबत माहिती देण्यात आली. त्याचे महत्त्व



मुकुल माधव फाउंडेशनच्यावतीने ताडीवाला रस्ता भागातील लहान मुलांची आरोग्य तपासणी करताना डॉक्टर.

पटवून देण्यात आले. तपासणीनंतर प्रत्येक मुलाला हायजेनिक कीट मोफत देण्यात आले. त्यामध्ये साबण, पावडर आदी गोष्टी आहेत.

या उपक्रमाबाबत मुकुल-माधव फाउंडेशनच्या विश्वस्त रितू छाब्रिया म्हणाल्या, सामाजिक बांधिलकीचा दृष्टिकोन ठेवून मुकुल-माधव फाउंडेशन गेल्या १३ वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्र, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात काम करीत आहेत. त्याच्या अंतर्गतच रविवारी या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तळागाळात राहणाऱ्या मुलांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करणे, हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे.